# शुष्क अस्थींचे खोरे

## पवित्र आत्मा आमचे नवीकरण कसे करतो ते मुलांना सांगा

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभु येशूबरोबर सदोदित गौरवात राहण्यासाठी तू मृतांना परत उठवशील अशी खात्री आमच्या मुलांना दे.''

मुलांना शिकवण्यासाठी पुढील पैकी कोणतीही कृती निवडा.

देवाने यहेज्केलला शुष्क अस्थींनी भरलेल्या खोफ्रयाचा दृष्टांत दाखवला. त्याचा वृत्तांत मोठया मुलाले किंवा शिक्षकांनी वाचून दाखवावा अथवा लक्षात ठेवून सांगावा ( **यहेज्केल 37:1-14** ) प्रथम मुलांना लक्ष देऊन ऐकायला सांगा देवाने यहेज्केलच्या द्वारे अभिवचन दिले त्याप्रमाणे इस्राएल लोकांचे तारण करण्याची आशा देवाने त्यांना कशी दिली ते यामध्ये पाहा.



वृत्तांत सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा (आवश्यकता असेल तरच उत्तरे सांगा)

- शुष्क अस्थींनी भरलेले खोरे संदेष्टयाला कोणी दाखवले?

  *उत्तर: पाहा वचन 1*
- यहेज्केलने त्या अस्थींना संदेश दिला तेव्हा त्याने कसला आवाज ऐकला?

  *उत्तर: पाहा वचन 7*
- देवाने फुंकलेल्या श्वासामुळे अस्थींचे काय झाले?

  *उत्तर: पाहा वचन 10*
- अस्थी कशाचे प्रतिनिधित्व करतात?

  *उत्तर: पाहा वचन 11 ह्या त्याच्या लोकांच्या अस्थी होत्या.*
- देवाने आपल्या लोकांना परत जीवन जगता यावे यासाठी कोणते अभिवचन दिले?

  *उत्तर: पाहा वचन 14*

**या वृत्तांताच्या भागांचे नाटयी करण करा.**

- हे नाटक सादर करण्यासाठी मुख्य उपासनेच्या पुढाफ्रयाची भेट घेऊन वेळ ठरवा.
- मुलांकडून व्यवस्थित तयारी करून घ्या.
- तुम्हांला सर्वच भूमिका केल्या पाहितेत असे नाही.

- मोठया मुलांना किंवा प्रौढांना पुढील भूमिका करायला द्या.

  **निवेदकः** वृत्तांत थोडक्यात सांगा आणि मुलांना काय बोलायचे ते लक्षात ठेवायला सहाय्य करा.

  **देवाची वाणी**

  **यहेज्केल**

- लहान मुलांना पुढील भूमिका करायला द्या.

  अस्थी तुमचे डोळे बंद करून जमिनीवर झोपा.

  **वारा.**

## शुष्क अस्थींचा दृष्टांत

**निवेदकः** यहेज्केल 37:1-14 ह्या शास्त्रभागातून दृष्टांत सांगा, मग म्हणा, ''देव काय म्हणतो ते ऐका.''

**देवाची वाणीः** ''यहेज्केल, माझ्या लोकांचे भविष्य मी तुला दाखवतो अस्थींनी भरलेले हे खोरे बघ ह्या अस्थी कधी पुन्हा सजीव होतील उसे तुला वाटते का?''

**यहेज्केलः** ''प्रभू हे फक्त तुलाच ठाऊक आहे.''

**देवाची वाणीः** ''त्यांना सांग मी ह्या अस्थी एकत्र करून त्यांना श्वास घालीन.''

**यहेज्केलः** ''शुष्क अस्थींनो, तुम्ही सजीव व्हाल!''

**अस्थीः** खडखड असा आवज करीत जमीनीवर झोपलेल्या स्थितीतच जवळ या. डोळे उघडू नका.

**यहेज्केलः** ''आता प्रभू आपल्या आत्म्याची फुंकर तुमच्यावर घालील आणि तुम्ही सजीव व्हा. वारा या वाहा!''

**वाराः** अस्थींच्या दिशेने जोरात फुंकर घाला.

**अस्थीः** उडी मारून सैनिकांसारखे ताठ उभे राहा. म्हणा, प्रभू ने आम्हांला सजीव केले आहे।''

''आम्ही त्या एकमेव सर्वसमर्थ देवाची स्तुती करतो!''

''सर्वसमर्थ त्याच्यासह गौरवात सर्वकाळ राहण्यासाठी मृतांना जिवंत करतो!''

**निवेदक किंवा मोठा मुलगा.** नाटकासाठी मदत करणाफ्रया सर्वाचे आभार माना.

**प्रश्न विचारा,** मुलांनी ह्या वृत्तांताचे नाट्यीकरण मोठया लोकांसाठी केले असेल तर त्यांनाही वर दिलेले प्रश्न मुलांना विचारण्यास सांगा.

**विचाराः** देवाने आम्हांला अभिवचने दिलेली आहेत ही अभिवचने भविष्यात पूर्ण होणार आहेत. अशा अभिवचनांची उदाहरणे सांगा. (मुलांनी किंवा मोठया माणसांनी उदाहरणे सांगावीत.)

अस्थींचे किंवा हाडांच्या सापळ्याचे मोठे **चित्र काढा.**

- तुम्ही काढलेल्या मोठया चित्राचे मोठे तुकडे करून ते मुलांना कोडयाप्रमाणे एकम जोडयला द्या.
- मुलांना ते चित्र काढायला द्या.
- लहान मुलांना मोठया मुलांनी मदत करावी.
- मुलांनी काढलेले चित्र मोठया माणसांना पुढच्या उपासनेच्या वेळी किंवा घरी दाखववावे.
- एखादी व्यक्ती कितीही वाईट असली तरी देवाचा आत्मा तिच्यात बदल घडवून आणतो हे ह्या अस्थींवरून समजते असे त्यांना स्पष्ट करून सांगता येईल.
- अस्थींवरून आमच्या असेही लक्षात येते की देव त्याच्या बरोबर सदासर्वकाळ गौरवात राहण्यासाठी आम्हांला मरणातून पुन्हा उठवणार आहे.



- आम्हांला सार्वकालिक जीवन केवळ येशूच्या द्वारेच मिळते. कारण त्यानेच आमच्या ऐवजी आमच्या पातकांची किंमत चुकती केली आणि आमचा सर्व अपमान स्वत:वर घेतला मग तो मरणातून परत उठला जेणे करून आम्हांला त्याकडे येता येईल आमच्याकरीता त्याने मार्ग तयार केला.

  पाठ करा 2 इतिहास 7:14

**म्हणा कविता:** यिर्मया 31:33,34 ही दोन वचने प्रत्येकी एका मुलाला म्हणायला सांगा पवित्र आत्मा आम्हांला कशा प्रकारे जीवन देतो हे सांगणाफ्रया कविता, गीते किंवा नाटिका मोठया मुलांना लिहिण्यास सांगा.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, शुष्क अस्थींना उठवून चालायला लावण्याचे सामर्थ्य फक्त तुझ्याच ठायी आहे. आम्ही मरण पावल्यावर तू आमच्यावर जीवनाची फुंकर घालणार आहेस आम्ही आध्यात्मिक दृष्टया आमच्या पातकांमध्ये मेलेले होतो, पण तू आम्हांला कायम स्वरूपी टिकणारे नवे, पवित्र जीवन दिलेस.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net